**कृषि वनस्पतीशास्त्र विभाग**
**कृषि महाविद्यालय, परभणी**
**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी**


जा.क्र.जिबी/२१४९/२०२४ दिनांक : ०५/०२/२०२४

## जाहीर प्रगटन

**विषय:- दि. २१-२३ फेब्रुवारी २०२४ दरम्यान होणाऱ्या पश्चिम विभागीय कृषि मेळाव्याकरिता उपस्थित शेतकरी व ईतर मान्यवर यांना नाष्टा व भोजन देण्याकरिता दरपत्रके पुरविणेबाबत**

**संदर्भः** मा. कुलगुरु कार्यालय, वनामकृवि, परभणी यांचे प्रशासकीय मंजुरी क्र.जीबी/३००१/२०२४, दि. २९/०१/२०२४.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात दि. २१-२३ फेब्रुवारी २०२४ दरम्यान पश्चिम विभागीय कृषि मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. त्याकरीता पश्चिम विभागीय कृषि मेळाव्यासाठी उपस्थित प्रगतशील शेतकरी, शास्त्रज्ञ व ईतर मान्यवर यांना चहा, नाष्टा व भोजन देण्याकरिता जाहिर प्रगटन देण्यात येत आहे. तरी आपण आपले दर खाली दिलेल्या भोजनाच्या मेन्यु प्रमाणे मा. अध्यक्ष, भोजन समिती तथा विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, वनामकृवि, परभणी यांच्या नावे देण्यात यावेत.

| अ.क्र. | तपशिल | संख्या | दर प्रती प्लेट/ कप |
|---|---|---|---|
| १ | **दि. २०/०२/२०२४ रात्रीचे जेवण**<br>ज्वारी भाकरी / पराठे, दाल तडका, जिरा राईस, तवा बेसन, पनिर बटर मसाला, सलाद, शेंगदाना चटणी, जवस चटणी, पाणी, रस अंगुरी, मुखवास | १०० | |
| २ | **दि. २१/०२/२०२४ सकाळचा चहा (Bed Tea)** | ५० | |
| ३ | **दि. २१/०२/२०२४ सकाळचा नाष्टा**<br>उपमा, इडली, वडा, सांबर, चटणी, अंजिर बर्फी, मिनी कचोरी, फ्रुट, चहा, कॉफी, बिस्कीट, पाणी | १५० | |
| ४ | **दि २१/०२/२०२४ दुपारचे जेवण**<br>ज्वार भाकरी, पालकपुरी, चपाती, दाल पिवळी, भेंडी मसाला, पनिर टिका मसाला, दिवाणी हंडी, जिरा राईस, पापड, कांदा पकोडा, ग्रिन सॅलड शेंगदाणा चटणी, पाणी बॉटल, बटर, गुलाब जामुन, मुखवास | ३०० | |
| ५ | **दि २१/०२/२०२४ संध्याकाळचे जेवण**<br>फुलके / बाजरी रोटी, दाल मखणी, व्हेज हैद्राबादी, पनिर पटियाला, दाल खिचडी, पापड, चमचम, ग्रिन सॅलड, जवस चटणी, शेंगदाणा चटणी, ठेचा, पाणी बॉटल, मुखवास | १५० | |
| ६ | **दि. २२/०२/२०२४ सकाळचा चहा (Bed Tea)** | ५० | |
| ७ | **दि. २२/०२/२०२४ सकाळचा नाष्टा**<br>उपमा, मिनी उत्तपा, ढोकळा, चटणी, मटकी फ्राय, दही, काजु कतली, मिनी समोसा, फ्रुट, चहा, कॉफी, बिस्कीट, पाणी | १५० | |
| ८ | **दि २२/०२/२०२४ दुपारचे जेवण**<br>ज्वारी रोटी, फुलका, पालकपुरी, दाल तडका, मिक्स व्हेज, काजु करी, मेथी मटार, प्लेन राईस, नायलोन पापड, नवरत्न चिवडा, मुग हलवा, शेंगदाणा चटणी, कारळ चटणी, मसाला ताक, पाणी बॉटल, ग्रिन सलाद, मुखवास | ३०० | |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | **दि २२/०२/२०२४ संध्याकाळचे जेवण**<br>टमाटा सुप/मनचाव सुप, फुलका बटर रोटी , छोटी खिचडी, कढी, झाऱ्या भजे, काजु करी, पालक पनिर, पापड रोस्टेड, ग्रिन सलाद, ठेचा, लोणचे, सिताफळ रबडी, जिलेबी, पाणी बॉटल, मुखवास | १५० | |
| १० | **दि. २३/०२/२०२४ सकाळचा चहा (Bed Tea)** | ५० | |
| ११ | **दि. २३/०२/२०२४ सकाळचा नाष्टा**<br>पोहे, दही, बटाटा वडा, सांबर वडा, चटणी, फ्रुट, चहा, कॉफी, बिस्कीट, पाणी | १५० | |
| १२ | **दि २३/०२/२०२४ दुपारचे जेवण**<br>पराठे, दाल बाटी, चना मसाला/दम आलू, लसून मेथी, व्हेज बिर्याणी, कर्ड राईस, दाल फ्राय, बुंदी रायता, पापड, कट मिरची भजे, शेंगदाणा चटणी, जवस चटणी, कोर्शीबीर, पाणी बॉटल, हालवा, मुखवास | ३०० | |
| १३ | **दि २३/०२/२०२४ संध्याकाळचे जेवण**<br>फुलके/ भाकरी,व्हेज बिर्याणी, कढी, जिरा दाल, वऱ्हाडी कोफ्ता, पालक पनिर, कांदा भजे, आलु वडा, केशर जिलेबी, शेंगदाणा चटणी, जवस चटणी, पाणी, ठेचा, सलाद, मुखवास | १५० | |
| १४ | **दि. २४/०२/२०२४ सकाळचा चहा (Bed Tea)** | ५० | |
| १५ | **दि. २४/०२/२०२४ सकाळचा नाष्टा**<br>उपमा, पोहे, दही, अंजिर बर्फी, चहा, कॉफी, पाणी, मुखवास | १५० | |

तरी वरील विवरणानुसार चहा, नाष्टा व भोजनाचा पुरवठा करू इच्छीणाऱ्या कंत्राटदारांनी सोवत जोडलेल्या अटी आणि शर्तीचे वाचन करून, **अध्यक्ष, भोजन समिती तथा विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, वनामकृवि, परभणी** यांचे कार्यालयात सोवत जोडलेल्या दरपत्रक, हमीपत्र नमुनाप्रमाणे भरलेल्या लिफाफेबंद, अटी, शर्ती व जीएसटीसह दि. १२/०२/२०२४ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सादर करावेत व त्यावर कंत्राटदाराची सही व शिक्का आवश्यक आहे. संबंधीत अटी व शर्ती जाहिर प्रगटन सोवत दिलेल्या आहेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.

**सोबतः अटी व शर्ती**

**अध्यक्ष**
**भोजन समिती**
**(पश्चिम विभागीय कृषि मेळावा-२०२४)**
**तथा**
**विभाग प्रमुख**
**कृषि वनस्पतीशास्त्र विभाग**
**वनामकृवि, परभणी**

१. नोटीस बोर्ड, विस्तार शिक्षण संचालनालय, प्रशासकीय इमारत, वनामकृवि, परभणी
२. नोटीस बोर्ड, संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि), वनामकृवि, परभणी
३. नोटीस बोर्ड, कुलसचिव कार्यालय, वनामकृवि, परभणी
४. नोटीस बोर्ड, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, वनामकृवि, परभणी

Scanned with OKEN Scanner

## दि. २१-२३ फेब्रुवारी २०२४ दरम्यान होणाऱ्या पश्चिम विभागीय कृषि मेळावा

### दरपत्रकाच्या अटी व शर्ती

१. अनामत रक्कम रू. ५०००/-(अक्षरी रू. पाच हजार केवळ) चा राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफ्ट / धनाकर्ष **नियंत्रक, वनामकृवि, परभणी** यांचे नावे देण्यात यावा, तो न जोडल्यास दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

२. भोजन हे उत्कृष्ठ धान्यापासुन तयार करणे अनिवार्य आहे तसेच भोजन निर्मितीकरीता वापरण्यात येणारे साहित्य (भांडी) स्वच्छ असावी.

३. उपरोक्त भोजनाचे सेवन केल्यास आरोग्यास कुठलाही धोका होणार नाही याची पदार्थ तयार करतेवेळी काळजी घ्यावी. आरोग्यास हानी पोहचल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहिल.

४. सुयोग्य सेवा मिळण्यासाठी भोजन बफे पध्दतीने वाटप करण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. तसेच व्यक्तीस वाटप करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सेवकांची नियुक्ती कंत्राटदारास करावी लागेल. सदर सेवक हे विनम्र सेवा देणारे असावेत तसेच सेवक स्वच्छ गणवेशात असणे आवश्यक आहे.

५. बफे पध्दतीने भोजन वाटप करण्यासाठी आवश्यक असणारे साहित्य उदा. प्लेट, ग्लास, वाटी (हात धुण्यासाठी पुरेसे वॉश बेसिन) इ.कंत्राटदारांनी पुरविणे आवश्यक आहे.

६. ज्या कंत्राटदाराचे अथवा प्रतिष्ठानाने अशा किंवा या पेक्षा मोठया जेवणाचे शासकीय कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडले असतील त्यांनी त्याचे सदरील भोजन पुरवठयाचे काम चांगल्या प्रकारे केल्याबाबतचे संबंधीत संस्थेचे अनुभव प्रमाणपत्र जोडले असल्यास प्राधान्य देण्यात यईल.

७. भोजन निर्देशित केलेल्या वेळेत, ठिकाणी पोचविण्याची व वाटपाची जबाबदारी कंत्राटदारावर राहिल.

८. भोजन प्रमाणबध्द तिखटामध्ये तसेच उच्चप्रतिच्या खाद्य तेलात करणे आवश्यक आहे.

९. कंत्राटदारास कुठल्याही प्रकारचा अग्रीम मिळणार नाही.

१०. कंत्राटदाराच्या त्याच्या देयकाची अदायगी ऑनलाईन करण्यात येईल. त्यासाठी त्यांचे प्रतिष्ठानाच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे. वैयक्तीक व्यक्तीच्या नावे धनादेश देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

११. सदरील शेतकरी मेळाव्यास प्रगतशील शेतकरी, शास्त्रज्ञ व ईतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. देयकाची अदायगी करतांना जेवढे ताट वाटप करुन प्राप्त झालेल्या कुपन्सनुसारच जेवढे कुपन्स कंत्राटदार जमा करेल तेवढयाच प्लेटचे देयक सादर करावे लागेल.

१२. कंत्राटदारास कामगार कायद्याचे सर्व नियम पाळणे आवश्यक आहे.

१३. नियमाप्रमाणे वस्तु व सेवा कर व इतर कर भरण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१४. दरपत्रक उघडणे बाबतच्या तारखेत बदल करण्याचे अधिकार विद्यापीठास राहतील.

१५. कमी दर असणाऱ्या पुरवठाधारकास भोजनाचा नमुना तपासणीकरीता देणे बंधनकारक आहे.

१६. दरपत्रक संबंधी काही वाद निर्माण झाल्यास परभणी न्यायालयांतर्गत अधिन राहून सोडविण्यात येईल.

१७. दरपत्रक मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

१८. नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी विद्यापीठावर राहणार नाही.

Scanned with OKEN Scanner

अ. दरपत्रकासोबत खालील प्रमाणपत्राच्या सत्यप्रती जोडण्यात याव्यात.

१. शॉप ॲक्टप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र

२. अन्न व औषधी विभाग महाराष्ट्र शासन यांचे अद्यावत खाद्यविक्रेते प्रमाणपत्र

३. वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (जीएसटी)

४. आधारकार्ड व पॅनकार्ड तसेच बँकेच्या पासबुकाची छायांकीत प्रत.

१९. भोजन पुरवठ्याचे काम चांगल्या प्रकारे केल्याबाबतचे संबंधीत संस्थेचे अनुभव प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य देण्यात यईल. दरपत्रक पॉकिटमध्ये मोहरबंद करून **पश्चिम विभागीय कृषि मेळावा दि. २१ ते २३ फेब्रुवारी २०२४ साठी भोजन दरपत्रक** असे स्पष्ट लिहून कंत्राटदाराचे नाव व सही सहित दरपत्रक दि. १२/०२/२०२४ रोजी दुपारी ०४ वाजेपर्यंत सादर करावी. सिलबंद पाकीटावर दरपत्रक सादर करण्याचा अंतिम दिनांक लिहण्यात यावा. कंत्राटदाराने सर्व अटी व शर्ती पुर्णपणे वाचल्या असुन त्याबाबतचे हमीपत्र देण्यात यावे. त्याच दिवशी दुपारी ०५ वाजता **विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, वनामकृवि, परभणी** यांच्या कार्यालयात दरपत्रक उघडल्या जातील. दरपत्रकामध्ये कोणतीही खाडाखोड करु नये.

**अध्यक्ष**
**भोजन समिती**
**(पश्चिम विभागीय कृषि मेळावा-२०२४)**
**तथा**
**विभाग प्रमुख**
**कृषि वनस्पतीशास्त्र विभाग**
**वनामकृवि, परभणी**

Scanned with OKEN Scanner